**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

Titie code MAHMAR 52037

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १३१ ● शुक्रवार १२ मे २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 131 | Date : 12/05/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4


# राज्यातील शिंदे सरकार बचावलं



नवी दिल्ली : शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्यास नकार देतानाच त्याबाबत विधानसभा अध्यक्षांनीच निर्णय घ्यावा, असा आदेश देत सर्वोच्च न्यायालयाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना गुरुवारी दिलासा दिला. त्याच वेळी सत्तांतराच्या घडामोडींदरम्यान राज्यपालांनी केलेल्या हस्तक्षेपावर ताशेरे ओढतानाच 'उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला नसता तर त्यांना मुख्यमंत्रीपदी पुनर्स्थापित करण्याचा विचार केला असता' असेही न्यायालयाने म्हटले. त्यामुळे शिंदे सरकार सुरक्षित राहिले असले तरी, न्यायालयाने सत्तासंघर्षांवर दिलेल्या निकालाने उद्धव ठाकरे यांना राजकीयदृष्ट्या बळ मिळाले आहे.

हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांसह विधानसभा अध्यक्ष आणि निवडणूक आयोग यांनी घेतलेल्या भूमिकांवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याच वेळी या खटल्याच्या केंद्रस्थानी असलेल्या नबाम रेबिया निकाल प्रकरणातील त्रुटींवर बोट ठेवत त्याबाबत फेरविचार करण्यासाठी मोठ्या घटनापीठाची नियुक्ती करण्याची घोषणाही सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी केली.

राज्यात गतवर्षी झालेल्या नाट्यपूर्ण सत्तांतरानंतर शिवसेनेच्या ठाकरे आणि शिंदे गटांकडून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या होत्या. या सर्व याचिकांची एकत्रित सुनावणी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील । पान २ वर

## घटनाबाह्य सरकार म्हणणाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने कालबाह्य केलं

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला




मुंबई : आजचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा लोकशाहीमध्ये अपेक्षित असलेला निकाल होता, अखेर सत्याचा विजय झाला अशी पहिली प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. आमचं सरकार घटनाबाह्य आहे असं म्हणणाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने आज कालबाह्य केलं आहे असंही ते म्हणाले. लोकशाहीमध्ये बहुमताला महत्त्व आहे, या देशात संविधान आहे त्याच्या बाहेर कुणालाही जाता येणार नाही हे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामधून स्पष्ट झालं आहे असं एकनाथ शिंदे म्हणाले. आम्ही स्थापन केलेलं सरकार हे कायद्याला धरुन आहे हे स्पष्ट झालं, । पान २ वर

## सत्तेसाठी हापापलेल्या राजकारण्यांची चिरफाड करणारा निकाल : उद्धव ठाकरे



मुंबई : : महाराष्ट्राच्या सत्ता संघर्षात घटनापीठाने मोठा निकाल दिला आहे. निकालात एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डहळपवश) यांना दिलासा दिला असला तरी घटनापीठाने या प्रकरणातील अनेक बाबींवर ताशेरे ओढले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाच्या निकालावर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे (णववहर्ीं ढहरलज्ञशीरू) यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. सत्तेसाठी हापापलेल्या राजकारण्यांची चिरफाड करणारा हा निकाल असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यांनी आज मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर माध्यमांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी घटनापीठाच्या निकालावर प्रतिक्रिया दिली.

## न्यायालयाचे राज्यपालांवर ताशेरे हा भाजपलाही मोठा फटका



मुंबई : सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाने तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर कठोर ताशेरे ओढल्याने हा भाजपलाही मोठा फटका आहे. सरकार पूर्णपणे कायदेशीर आहे आणि आम्ही चुकीचे काहीच केले नसल्याचा दावा शिंदे-फडणवीस यांनी आतापर्यंत केला होता. त्यांच्या दाव्याला न्यायालयाच्या निर्णयाने धक्का बसला आहे.

विधानसभेत बहुमत सिद्ध केल्याने सर्वोच्च न्यायालयाने शिंदे-फडणवीस सरकारला अभय दिले आहे. मात्र ज्या पद्धतीने हे सरकार सत्तेवर आले आणि राज्यपालांनी निर्णय घेतले, त्यावर न्यायालयाने कठोर ताशेरे ओढले आहेत. शिवसेनेतील काही सदस्य फुटले किंवा त्यांनी वेगळी भूमिका घेतली, हा पक्षांतर्गत प्रश्न होता. मात्र त्यांचे पत्र म्हणजे त्यांनी महाविकास आघाडी सरकारचा पाठिंबा काढला आहे, असा निष्कर्ष काढून ठाकरे यांना विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाण्याचे निर्देश देणे, ही राज्यपालांची कृती न्यायालयाने बेकायदेशीर ठरविली आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप आमदारांना ठाकरे सरकारविरोधात अविश्वास ठराव मांडणे शक्य होते. पण तसे न करता केवळ बंडखोर आमदारांच्या पत्रावर विसंबून राहून सरकारने बहुमत गमावल्याचा निष्कर्ष राज्यपालांना काढण्याची कृतीही न्यायालयाने घटनाबाह्य ठरविली आहे. त्यामुळे भाजपने राज्यपालांना हाताशी धरून महाविकास आघाडी सरकार पाडण्याची केलेली खेळी कायदेशीर मुद्द्यांवर अवैध ठरली आहे.तत्कालीन विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी शिवसेना बंडखोर आमदारांना अपात्रतेच्या नोटीसा बजावल्या होत्या. राज्यघटनेतील दहाव्या परिशिष्टातील तरतुदींनुसार विधानसभा अध्यक्षांना अपात्रतेच्या याचिकांवर निर्णयाचे अधिकार असतात. विधिमंडळाच्या अधिकारातही राज्यपालांनी ढवळाढवळ केल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

## १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे



मुंबई : गेल्या काही महिन्यांपासून लक्ष लागून राहिलेल्या १६ आमदारांच्या अपात्रतेवरून सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल आज जाहीर केला. त्यानुसार, १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे सोपवण्यात आला आहे. म्हणजे, याप्रकरणी आता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर निर्णय घेऊ शकणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात निकालाचे वाचन नुकतेच संपले आहे. त्यानंतर, सध्या लंडनमध्ये असलेल्या राहुल नार्वेकरांनीही तत्काळ प्रतिक्रिया दिली. ते एबीपी माझाशी बोलत होते.

राहुल नार्वेकर म्हणाले की, या निकालात अनेक प्रकारचं रुलिंग सर्वोच्च न्यायालयाने दिलं आहे. अपात्रतेसंदर्भातील निर्णयात न्यायालयाने नमूद केलं आहे की, विधिमंडळ पक्षाचे काय अधिकार आहेत या सर्व बाबींचं विचार करावा लागेल. हे अपेक्षित आहे की अध्यक्षांनी हा निर्णय घ्यावा की विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्षाचं प्रतिनिधित्व कोण करतं?

या सुनावणीवेळी सुप्रीम कोर्टाने म्हटलं आहे की, आमदारांच्या अपात्रतेच्या निर्णयात हे न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही. विधानसभा अध्यक्षांनी लवकरात लवकर आमदार अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा. विधिमंडळ पक्ष नसून राजकीय पक्षच प्रतोदाची नियुक्ती करत असतो. विशिष्ट पद्धतीने मतदान करणं किंवा अनुपस्थित राहाणं याचे आदेश राजकीय पक्ष देत असतो, विधिमंडळ पक्ष नाही. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांनी शिंदे गटाकडून नियुक्त केलेल्या प्रतोदांना मान्यता देणं बेकायदेशीर होतं.

महाविकास आघाडीची । पान २ वर

## शरद पवार विरोधकांचा चेहरा झाल्यास आनंद वाटेल; नितीश कुमार



मुंबई : राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार जर २०२४ सालच्या निवडणुकीसाठी विरोधी पक्षांचा चेहरा झाल्यास आपल्याला आनंदच वाटेल असं जनता दल युनायटेडचे नेते आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी म्हटलंय. भाजप देशविरोधी काम करत असून त्याच्याविरोधात देशातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्र यावं यासाठी आपण प्रयत्न करत असल्याचं ते म्हणाले. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि राष्ट्रीय जनता दलचे अध्यक्ष तेजस्वी यादव यांनी आज शरद पवारांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. नितीश कुमार म्हणाले की, देशात भाजप जे काही करतंय ते चुकीचं करतंय. भाजप देशविरोधी काम करत आहे, त्यामुळे देशातील सर्व विरोधी पक्ष एकत्रित आल्यास लोकशाही वाचेल. त्याचाच एक भाग म्हणून आपण आज शरद पवारांची भेट घेतली. इतरही विरोधी । पान २ वर

## समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता प्रकरणावरील सुनावणी पूर्ण; सुप्रीम कोर्टाकडून निकाल राखीव



नवी दिल्ली : सुप्रीम कोर्टात समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता देण्याच्या मागणीवरील याचिकेची सुनावणी आज पूर्ण झाली. घटनापीठाने आज निकाल राखीव ठेवला असल्याचे सांगितले. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. संजय किशन कौल, न्या. एस रविंद्र भट, न्या. हिमा कोहली आणि न्या. पीएस नरसिंहा यांच्या घटनापीठासमोर याची सुनावणी झाली. जवळपास २० याचिकांवरील सुनावणी पूर्ण करण्यात आली.

विशेष विवाह कायदा १९५४, हिंदू विवाह कायदा १९५५ आणि विदेशी विवाह कायदा १९६९ मधील तरतुदींना या याचिकांमध्ये आव्हान देण्यात आले आहे. हे कायदे समलिंगी विवाहांना मान्यता देत नसल्याचे आक्षेप घेण्यात याचिकेतून घेण्यात आला. सुनावणीदरम्यान, खंडपीठाने सांगितले की ते केवळ विशेष विवाह कायद्यापुरतेच हे प्रकरण मर्यादित ठेवणार आहे. वैयक्तिक कायद्यांना स्पर्श करणार नसल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले.

या प्रकरणात केंद्र सरकारने समलिंगी जोडप्यांच्या विवाहाला विरोध केला. त्याशिवाय, समलिंगी जोडप्यांना काही अधिकार दिले जाऊ शकतात की नाही हे । पान २ वर

## अटक बेकायदेशीर, इम्रान खान यांना तातडीने सोडा

### पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाचा आदेश



नवी दिल्ली : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांची अटक बेकायदेशीर असून त्यांना तातडीने सोडा असा आदेश पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या अटकेसंदर्भात गुरुवारी ११ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी । पान २ वर

## दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सातलिंगप्पा परमशेट्टी तर उपसभापती पदी सिध्दाराम बाके बिनविरोध

### शेतकरी व व्यापार्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही : आ. सचिन कल्याणशेट्टी




अक्कलकोट/प्रतिनिधी : दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी व व्यापार्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही. शेतकर्यांसाठी शासकीय योजना दुधनी बाजार समितीमध्ये राबविल्या जातील. बाजार समितीवर भाजपाचा झेंडा फडकाविण्यासाठी जे कार्यकर्ते झटले. या कार्यकर्त्यांचा हा विजय असल्याचे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी अप्पू उर्फ सातलिंगप्पा सैदप्पा परमशेट्टी तर उपसभापती पदी सिध्दाराम आण्णासाहेब बाके यांचा एकमेव अर्ज आल्याने अविरोध निवड करण्यात आली. सकाळी ११ वा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश नालवार यांच्या अध्यक्षतेखाली निवडीची प्रक्रिया संपन्न झाली.आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या नेतृत्वाखाली दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत भाजपाने माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी पॅनलचा दारुण पराभव केला होता. सभापती व उपसभापतीची निवड गुरुवारी करण्यात आली. या निवडीनंतर सभापती व उपसभापती यांचा सत्कार करुन फटाक्यांची आतषबाजीने जल्लोष करण्यात आला.

या निवडीप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी, मुंबईचे आमदार अमित प्रतापसिंह, माजी आमदार सिद्रामप्पा पाटील, नूतन संचालक देवेंद्र सिद्राम बिराजदार, विश्वनाथ तुकप्पा नागुर, विश्वनाथ निंगप्पा कोगनुर, मल्लिकार्जुन मडोळप्पा झळकी, मोतीराम शिवू राठोड, सुवर्णा सुधीर मचाले, अश्विनी विजयकुमार सालेगाव, वहिदपाशा इब्राहिम शेख, निंगप्पा सिद्राम पुजारी, सिध्दाराम निलकंठ तोळणुरे, रमेश रेवणसिध्द पाटील, शिवानंद बाबुराव पाटील, ईरण्णा अंदप्पा दसाडे, सातलिंग शरणप्पा परमशेट्टी, चंद्रकांत श्रीमंतराव येगदी, बाबु गणपती कोळी, सचिव स्वामीनाथ स्थावरमठ या संचालकासह इतर मान्यवरांमध्ये अणण्पा बाराचारी, अप्पासाहेब पाटील, महेश हिंडोळे, भाजपा महिला ता.अध्यक्षा सुरेखा होळीकट्टी, भाजपा शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, मिलन कल्याणशेट्टी, विवेकानंद उंबरजे, सागर कल्याणशेट्टी, सुधीर मचाले, राजकुमार झिंगाडे, प्रकाश पाटील, मल्लिकार्जुन आळगी, सुर्यकांत माळगे, दयानंद बिडवे, चंद्रकांत दसले, नन्हु कोरबु, रजाक सय्यद, शिवशंकर स्वामी, कांतु धनशेट्टी, बाळासाहेब एकबोटे, राजु भरडे, कोंपा आदीजण उपस्थित होते.

यावेळी राजशेखर दोशी, शिवानंद हौदे, गिरमलप्पा सवळगी, रामचंद्र बिराजदार, शंकर भांजी, महेश पाटील, अतुल मेळकुंदे, बसवराज हौदे, सुभाष हौदे, शिवशरणप्पा हाबसी, जगन्नाथ जाधव, लक्ष्मीपुत्र पाटील, शाणप्पा दैनक, बसवराज परमशेट्टी, गोविंदप्पा परमशेट्टी, निर्मला गायकवाड, दौलत हौदे, मल्लिनाथ येगदी, भिमा अंदेनी, इरय्या पुराणिक, उमेश सावळसुर, काशिनाथ यरगल, रेणप्पा माशाळ, मल्लिनाथ टक्का, बाबा टक्कळकी, गुरुशांत बोळगोंडा, अर्जुन पुजारी, शांतलिंग वागदरी, शांतलिंग अंदेनी, लक्ष्मीपुत्र अंदेनी, मल्लिनाथ कामनळ्ळी, हणमंत कलशेट्टी यांच्यासह भाजपाचे असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



✻ सुविचार ✻

चांगला वक्ता हा जातिवंत वीर असतो.

# शेतमाल तारण कर्ज योजना; शेतकऱ्यांना ठरतेय वरदान

राज्यात कृषि पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सुसूत्रता आणि समन्वय आणण्याच्यादृष्टीने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ अत्यंत महत्त्वपूर्ण काम करत आहे.

कृषि पणन मंडळ पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषि पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांच्या विकासासाठी पणन मंडळ प्रयत्न करत आहे. राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करुन ही केंद्रे सक्षमपणे चालवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. कृषि पणन मंडळामार्फत शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजना राबविल्या जातात. त्यापैकीच एक म्हणजे शेतमाल तारण कर्ज योजना. याविषयीची माहिती.

उतरत्या बाजारभावामुळे शेतमालाचे काढणी हंगामात होणारे आर्थिक नुकसान टाळून राज्यातील शेतकऱ्यांना सुलभ कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ १९९० पासून राज्यातील बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतमाल तारण कर्ज योजना राबवित आहे. शेतमालाचे काढणी हंगामात शेतकऱ्यांस असलेली आर्थिक निकड विचारात घेऊन या गरजेच्यावेळी आर्थिक सहाय उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

योजनेची ठळक वैशिष्ट्ये

या योजनेमध्ये तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सुर्यफूल, हरभरा,




धान, करडई, ज्वारी, बाजरी, गहू, मका, बेदाणा, काजू बी, हळद, सुपारी व राजमा या शेतमालाचा समावेश आहे. शेतकऱ्यांना बाजार समितीच्या गोदामात तारणात ठेवलेल्या शेतमालाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्क्यांपर्यंत ६ टक्के व्याजदराने ६ महिने कालावधीसाठी कर्ज त्वरित उपलब्ध करुन दिले जाते. बाजार समितीच्या गोदामात ठेवलेल्या शेतकऱ्यांच्या शेतमालासाठी गोदाम भाडे, विमा, देखरेख खर्च इत्यादी खर्चाची जबाबदारी बाजार समितीवर असल्याने शेतकऱ्यांना त्याचा भुर्दंड नाही.

व्याजात सवलत

सहा महिन्याच्या आत कर्ज परतफेड करणाऱ्या बाजार समित्यांना ३ टक्के व्याज सवलत देण्यात येते. स्वनिधीतून तारण कर्ज राबविणाऱ्या बाजार समित्यांनी वाटप केलेल्या तारण कर्ज रकमेवर ३ टक्के व्याज सवलत देण्यात येते. योजना राबविण्यासाठी स्वनिधी नसलेल्या बाजार समित्यांना पणन मंडळाकडून ५ लाख रुपये अग्रिम उपलब्ध करुन दिला जातो. राज्य वखार महामंडळाच्या गोदामातील शेतकऱ्यांच्या मालाच्या वखार पावतीवर तारण कर्ज उपलब्ध करुन दिले जाते.

तारण कर्जाची मुदत व व्याजदर

शेतमालाच्या प्रकारानुसार राजम्यासाठी बाजारभावाच्या ७५ टक्के अथवा प्रति क्विंटल रुपये ३ हजार यापैकी कमी असणारी रक्कम ६ महिने मुदतीसाठी ६ टक्के व्याजदराने देण्यात येते. तर काजू बी व सुपारीसाठी बाजार भावानुसार एकूण किमतीच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त १०० रुपये प्रति किलो यापैकी कमी असणारी रक्कम ६ महिने मुदतीसाठी ६ टक्के व्याजदराने देण्यात येते. बेदाणा पिकासाठी एकूण किंमतीच्या कमाल ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त ७ हजार ५०० प्रति क्विंटल यातील कमी असणारी रक्कम ६ महिने मुदतीसाठी ६ टक्के व्याजदराने देण्यात येते.कृषि पणन मंडळामार्फत २०२२-२३ यावर्षीच्या हंगामात राज्यातील ६१ बाजार समित्यांनी ३ हजार २६९ शेतकऱ्यांचा १ लाख ४७ हजार २९३ क्विंटल शेतमाल तारणात स्विकारुन त्यांना एकूण ३९ कोटी ९८ लाख इतक्या रकमेचे तारण कर्ज वितरीत करण्यात आले आहे. बाजार समित्या व शेतकऱ्यांकडून योजनेस चांगला प्रतिसाद मिळत असून शेतमाल तारण कर्ज योजना ही राज्यातील धान्य उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहे. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या ु.ीराल.लो या संकेतस्थळास भेट द्यावी.

**संकलन : विभागीय माहिती कार्यालय, पुणे**

## संपादकीय

### भाजपाविरोधी मोर्चेबांधणी

भाजपविरोधी आघाडीची बांधणी जोरदारपणे सुरु आहे. मात्र, आघाडीचा चेहरा कोण असेल? या प्रश्नावर काही ठोस उत्तर मिळालेले नाही. याच क्रमात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सूचनेनुसार विरोधी पक्षांच्या नेत्यांची पुढील बैठक बिहारमध्ये होणार आहे. पाटण्यात या बैठकीची जोरदार तयारी सुरू झाली आहे. बिहार हे राज्य ममतांसाठी खास आहे. त्यांच्या राजकीय प्रवासाला एका उंचीवर नेऊन ठेवणारा किस्सा याच बिहारच्या नेत्याशी संबंधित आहे. ममता कोलकात्यातील जोगमाया देवी महाविद्यालयात शिकत होत्या. शिक्षण घेत असतानाच त्यांनी काँग्रेस (आय)ची विद्यार्थी संघटना छात्र परिषदेची स्थापना केली. त्यांची राजकीय कारकिर्द १९७० च्या दशकात काँग्रेसमधून सुरू झाली. साधारण १९७५ सालची गोष्ट आहे. समाजवादी कार्यकर्ते जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीला त्यांनी त्यांच्याच शैलीत विरोध केला. जेपींच्या गाडीच्या बोनेटवर चढून त्यांनी निषेध नोंदवला. जयप्रकाश नारायण कोलकाता दौऱ्यावर होते. जेपी इतर आंदोलन समर्थक नेत्यांसह कोलकाता येथे का सभेला संबोधित करणार होते. त्यांचा ताफा येताच काँग्रेस कार्यकर्त्यांनी रास्ता रोको केला. त्यानंतर ममता देशभरात प्रसिध्द झाल्या. काँग्रेसमध्ये असताना ममता यांची ही पहिलीच कृती होती. यानंतर त्यांची लोकप्रियता वाढतच गेली. जेपींच्या आंदोलनामुळे १९७७ मध्ये काँग्रेस सत्तेतून बाहेर फेकली गेली. जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या सरकारमध्ये मोरारजी देसाई पंतप्रधान झाले. मोरारजीभाई कोलकात्यात आल्यावर त्यांना काळे झेंडे दाखवण्याची योजना काँग्रेस कार्यकर्त्यांनी आखली. कडेकोट बंदोबस्तात हे शक्य होईल का नाही? असा प्रश्न होता. या आव्हानात्मक कामाची जबाबदारी ममता यांच्यावर सोपवण्यात आली. पंतप्रधानांचा ताफा आल्यानंतर ममता अचानक बदललेल्या ड्रेसमध्ये रेड रोडवर प ं त प्र धा ना ं च्या गाडीसमोर हजर झाल्या. त्यांच्या हातात काळा झेंडा होता. त्यांनी हा झेंडा फडकावला. ममता प्रकाशझोतात येण्याची ही दुसरी वेळ होती. त्यानंतर ममता यांनी राजकारणात आपला प्रभाव वाढवायला सुरुवात केली. ममता यांनी जेपींना विरोध केला असेल, पण त्यांच्या चळवळीचे यश त्या मनापासून स्वीकारतात. जेपींच्या आंदोलनाची सुरुवात पाटणामधूनच झाली. त्यामुळे विरोधी पक्षांची पुढची बैठक पाटण्यातच बोलावण्यात यावी, अशी त्यांची इच्छा आहे. पाटणा येथे बैठक घेण्याची तयारी सुरू आहे.

पान १ वरुन

## राज्यातील शिंदे सरकार

न्या. हिमा कोहली, न्या. एम. आर. शहा, न्या. पी. एस. नरसिंहा, न्या. कृष्ण मुरारी या पाच सदस्यीय घटनापीठासमोर झाली. एकूण आठ दिवस झालेल्या युक्तिवादानंतर १६ मार्च रोजी निकाल राखून ठेवण्यात आला होता. गुरूवारी घटनापीठाने एकमताने निकाल दिला. १४१ पानी निकालपत्रात तत्कालिन राज्यपालांची भूमिका, विधीमंडळ पक्षाचे नेते आणि प्रतोद नियुक्ती प्रक्रीयेत विधानसभा अध्यक्षांनी काही बाबींकडे केलेले दुर्लक्ष, निवडणूक आयोगाची स्वायत्तता आदी महत्त्वाच्या मुद्दयांवर कठोर भाष्य करण्यात आले आहे.

उद्धव ठाकरे यांनी तडकाफडकी दिलेला मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा हे शिंदे-भाजप सरकारच्या बचावाचे प्रमुख कारण ठरल्याचे या निकालामुळे स्पष्ट झाले आहे. उद्धव ठाकरे यांनी विधानसभेत बहुमताची चाचणीला सामोरे न जाता मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला पूर्वपरिस्थिती कायम करता येणार नाही, असे सरन्यायाधीशांनी आदेशपत्रात स्पष्ट केले. शिंदे-फडणवीसांची सत्तास्थापना घटनाबाह्य असल्याने ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखालील महाविकास आघाडी सरकारला पुन्हा सत्ता बहाल करावी, हा ठाकरे गटाचा युक्तिवाद याच मुद्दयावर घटनापीठाने फेटाळून लावला.

शिंदे गटाने मुख्य प्रतोद म्हणून भरत गोगावले यांची केलेली नियुक्ती व त्याला विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेली मान्यता पूर्णपणे चुकीची होती. शिवसेनेमध्ये फूट पडली आहे, हे नार्वेकर यांना माहित होते. त्यानंतर कोणता गट अधिकृत शिवसेना आहे, हे त्यांनी दोन्ही गटांची सुनावणी घेऊन ठरवायला हवे होते, असे न्यायालयाने आदेशात म्हटले. पक्षप्रतोद ठरवण्याचा अधिकार पक्षसंघटनेचाच असल्याचे न्यायालयाने म्हटले. शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्याचा निर्णय विधानसभा अध्यक्षांनी योग्य वेळेत घ्यावा, असे आदेश घटनापीठाने दिले.

नबाम रेबिया प्रकरण मोठ्या पीठाकडे

शिंदे गटातील आमदारांना अपात्रतेची नोटीस बजावणारे विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्या विरोधात अविश्वासाची नोटीस देण्यात आली होती. या नोटिशीमुळे उपाध्यक्षांचे अधिकार रद्द होतात, असा युक्तिवाद नबाम रेबिया प्रकरणातील निकालाच्या आधारे शिंदे गटाकडून करण्यात आला होता. मात्र या निकालात नबाम रेबियाचा निकाल विचारात घेण्यात आला नाही. याचा फेरविचार करण्यासाठी सात सदस्यांच्या घटनापीठाची नियुक्ती करण्याचा निर्णय सरन्यायाधीशांनी जाहीर केला. यासंदर्भात ठाकरे गटाकडून मागणी करण्यात आली होती.

### १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय

सत्ता असताना विधानसभा अध्यक्ष काँग्रेस नेते नाना पटोले होते. मात्र, त्यांना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पद मिळाल्याने त्यांनी विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तेव्हापासून हे पद रिकामे होते. त्यामुळे विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याकडे अध्यक्षपदाची कायदेशीर सूत्रे होती. त्यानुसार, त्यांनी १६ आमदारांना अपात्र ठरवण्याचा निर्णय घेतला. परंतु, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्याने महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी भाजपासोबत हातमिळवणी करून शिंदे-फडणीस सरकार स्थापन केले. त्यानंतर, राज्यपालांनी बहुमत चाचणी करण्याचे आदेश दिले. त्यासाठी विशेष अधिवेशन बोलावण्यात आले. या अधिवेशनात रिक्त असलेल्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर, पुढच्या राजकीय नाट्याला सुरुवात झाली.

### शरद पवार विरोधकांचा चेहरा

पक्षांच्या आम्ही भेटी घेऊ.

शरद पवारांनी राजीनामा दिल्यानंतर वाईट वाटल्याचं नितीश कुमार म्हणाले. आमचं हेचं म्हणणं होतं की विरोधी पक्षांना तुमची गरज आहे, त्यामुळं राजीनामा मागे घ्या अशी आमची मागणी होती असं नितीश कुमार म्हणाले.

देशातील लोकशाही वाचवायची असेल तर सर्व विरोधकांनी एकत्र येणं गरजेचं असल्याचं राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले. ते म्हणाले की, कर्नाटकात भाजपविरोधी सरकार सत्तेत येणार आहे, हीच परिस्थिती आज देशभर आहे. त्यासाठी आपल्या सर्वांना एकत्र येऊन काम करावं लागणार आहे. विरोधकांनी एकत्र राहिल्यास विजय निश्चित आहे.विरोधी पक्षाचा चेहरा कोण असावा याचा निर्णय नंतर घेतला जाईल, त्यामुळे सध्या सर्वांनी एकत्र येणं ही पहिली गरज आहे असं शरद पवार म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निकालावर बोलताना शरद पवार म्हणाले की, कोर्टाने राज्यकर्त्यांबाबत तीव्र भूमिका मांडली आहे. काही निर्णय अद्याप येणं बाकी आहे. अपात्रतेचा निर्णय घ्यावा याबाबत कोर्टाने अध्यक्षांना सांगितलं आहे. राज्यपालांची भूमिका चुकीची राहिली होती याचं उत्तम उदाहरण महाराष्ट्राने पाहिलं आहे असं शरद पवार म्हणाले. राज्यपाल हे घटनात्मक पद आहे पण तत्कालीन राज्यापालांकडून राज्यघटनेतील तरतुदींची वेळोवेळी पायमल्ली केली गेली असंही शरद पवार म्हणाले.

### समलिंगी विवाहाला कायदेशीर

ठरवणे संसदेचा अधिकार असल्याचे सांगत याचिकांना विरोध केला. समलिंगी जोडप्यांना कल्याणकारी योजना आणि सामाजिक सुरक्षेचा फायदा मिळू शकेल यावरही सुनावणी दरम्यान चर्चा झाली. यामध्ये संयुक्त बँक खात्यांना परवानगी देणे, जीवन विमा पॉलिसीमध्ये भागीदाराला नॉमिनी बनवण्याची सूट, पीएफ, पेन्शन आदी सध्याच्या कायद्यांमध्ये हस्तक्षेप न करता समलिंगी जोडप्यांना विवाहाच्या अधिकाराची घोषणा करता येईल का याचाही खंडपीठाने विचार केला. याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद केला की विशेष विवाह कायद्यातील पती आणि पत्नी हे शब्द लिंग तटस्थ पद्धतीने पती किंवा व्यक्ती म्हणून वाचले जावेत. विशेष विवाह कायदा पूर्णपणे वेगळ्या उद्देशाने बनवण्यात आला होता आणि तो १९५४ मध्ये मंजूर झाला तेव्हा कायदेमंडळाने समलिंगी जोडप्यांना आपल्या कक्षेत आणण्याचा विचार केला नाही, असे सांगून केंद्र सरकारने याला विरोध केला. केंद्राने असेही म्हटले आहे की अशा अर्थाचा अर्थ दत्तक, देखभाल, सरोगसी, उत्तराधिकार, घटस्फोट इत्यादींशी संबंधित इतर विविध कायदे कमकुवत होतील.राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने समलिंगी जोडप्यांना दत्तक घेण्याची परवानगी देण्याबद्दल चिंता व्यक्त केली. दुसरीकडे, दिल्ली बाल संरक्षण अधिकार आयोगाने याचिकांचे समर्थन करत समलिंगी जोडप्यांना दत्तक घेण्याच्या अधिकाराचे समर्थन केले.

### अटक बेकायदेशीर, इम्रान खान

झाली. न्यायाधीश उमर अता बंदियाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सुनावणीवर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायधीशांनी इम्रान खान यांना अटक केल्यानंतर एनएबीला चांगलेच फटकारले होते. तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी करण्यात आली. यावेळी मुख्य न्यायाधीश उमर अता बंदियाल यांनी इम्रान यांना इस्लामाबाद न्यायालयाच्या परिसरातून अटक करण्यावर प्रश्न उपस्थित केला होता. यासोबतच सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नॅशनल अकाउंटेबिलिटी ब्युरोला पीटीआयचे अध्यक्ष इम्रान खान यांना तासाभरात न्यायालयात हजर करण्याचे निर्देश दिले.

## आदिवासी कोळी समाज आक्रमक

# पंढरीत प्रशासनाच्या प्रतिकात्मक पुतळ्याला १६ वेळा चंद्रभागेत बुडवून केले आंदोलन



पंढरपुर/प्रतिनिधीः टोकरे कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीला जात प्रमाणपत्र सुलभरीत्या मिळावे यासाठी धुळे जिल्हा कोळी समाजाच्या नेत्या गीतांजलीताई कोळी २४ एप्रिल पासून आमरण अन्नत्याग उपोषणाला बसलेल्या असून आज १६ दिवस झाले तरीही त्यांच्या या आंदोलनाची धुळे जिल्हा प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे याचे तीव्र पडसाद सबंध महाराष्ट्रात उमटत आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी कोळी बांधवांनी याविरुध्द यल्गार पुकारला असुन आज पंढरीतही याचे तीव्र पडसाद उमटलेले आढळून आले. महर्षी वाल्मिकी संघाने याच्या निषेधार्थ धुळे प्रशासनाचा प्रतिकात्मक पुतळा बनवून तो पुतळा चंद्रभागेच्या पाण्यात १६ वेळा बुडवून आपल्या भावना शासनापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. यावेळी बोलताना महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव म्हणाले की, आदिवासी कोळी समाजाची एक महिला गेली १६ दिवस झाले, जात प्रमाणपत्र सुलभरीत्या मिळावे म्हणून आमरण अन्नत्याग उपोषणाला बसलेली आहे. परंतु धुळे जिल्हा प्रशासनाने त्यांच्या या आंदोलनाची दखल न घेतल्याने राज्यभरात तीव्र पडसाद उमटत आहेत. १६ दिवस अन्न त्याग केल्यामुळे गीतांजली ताईसह उपोषणकर्त्यांची तब्येत अत्यंत खालावलेली असून कोणत्याही क्षणी त्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो अशी परिस्थिती निर्माण झाली असताना सुद्धा निगरगट्ट प्रशासन डोळेझाक करत आहे. यावरुन प्रशासनाची संवेदनशीलता संपलेली दिसून येतेय. अशा या असंवेदनशील प्रशासनाचा निषेध म्हणून धुळे जिल्हा प्रशासनाचा प्रतीकात्मक पुतळा तयार करून सोळा वेळा पंढरपूरच्या चंद्रभागा नदीमध्ये बुडवून प्रशासनाचा तीव्र निषेध करण्यात आला. आत्ता तरी प्रशासनाने याकडे गांभिर्याने लक्ष घालून त्वरित दखल घ्यावी, गीतांजली ताईला वाचवावे अन्यथा महाराष्ट्रामध्ये त्याचे तीव्र पडसाद उमटतील आणि जी परिस्थिती निर्माण होईल त्या परिस्थितीला धुळे जिल्हा प्रशासन जबाबदार राहील असही त्यांनी सांगितले.यावेळी महर्षी वाल्मिकी संघासह महादेव कोळी समाजाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# टाकळीवाडीतील शेतकऱ्याचा पाण्याअभावी दोन एकर ऊस करपला



टाकळीवाडी : नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील शेतकरी धवलकुमार महावीर पाटील व राजकुमार धन्यकुमार पाटील या शेतकऱ्यांचे पाण्याअभावी दोन एकर ऊस करपला. टाकळीवाडी मध्ये माळ भाग शेती जास्त असल्यामुळे यावर्षी वळवाच्या पावसाने सुद्धा दांडी मारल्यामुळे विहीरी, बोर ,यांना पाणी कमी आले होते. पाण्याचे नियोजन होत नव्हते. सध्या शेती खर्च एकरी ५०.०००/- हजार रुपये खर्च येतो. सध्या ऊस करपल्यामुळे उत्पन्न किती निघणार व शेती कशी परवडणार याच्या चिंतेत शेतकरी आहेत. सध्या शेती परवडत नाही. पाणी हे पिकाच राजा आहे. पाण्याअभावी शेती शक्य नाही. सध्या शेतकरी चिंताग्रस्त आहेत. सोमवारी झालेल्या वळवाच्या पावसामुळे थोडाफार आधार झालेला आहे पिकांना.ऊस पिकाला पाणी भरपूर लागते . ऊस करपल्यामुळे शेतकरी नाराज शेतकऱ्याने जगायचे कसे हा प्रश्न आता निर्माण झालेला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचा निवडणूक कार्यक्रम जाहिर

सोलापूर/प्रतिनिधीः सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना लि.चंद्रभागानगर, पो.भाळवणी, (ता.पंढरपूर ) या सहकारी साखर कारखान्याची संचालक मंडळाची निवडणूक २०२३-२४ ते २०२८-२९ हा कार्यक्रम जाहिर झाला आहे. २१ संचालक निवडीसाठी हा निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला आहे. १६ जून २०२३ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० यावेळेत मतदान होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी भारत वाघमारे यांनी दिली.

या निवडणूकीसाठी नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी, प्रांताधिकारी कार्यालय येथील सभागृह, पंढरपूर येथे १२ ते १८ मे २०२३ याकालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत मिळणार आहेत. मिळालेल्या नामनिर्देशन पत्राची यादी त्या त्या दिवशी प्रसिध्द करण्यात येणार आहे. नामनिर्देशन पत्राची छानन्नी १९ मे २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजले पासूण करण्यात येणार आहे. जे नामनिर्देशन पत्र ग्राह्य होतील त्याची यादी २२ मे २०२३ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात व संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारांना नामनिर्देशन पत्र २२ मे ते ०५ जून २०२३ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत मागे घेता येतील. निवडणूक चिन्हाचे वाटप ०६ जून २०२३ करण्यात येणार आहे. मतदान १६ जून रोजी होणार असून, शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथे मतमोजणी आणि निकाल १८ जून २०२३ रोजी घोषित करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी भारत वाघमारे यांनी सांगितले.

# जंगली पीर बाबा उरूस मोठ्या उत्साहात संपन्न



पत्रकार नामदेव निर्मळे

सैनिक टाकळी/ टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जंगली पीर बाबा उरूस मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दिनांक १०/०५/२०२३ रोजी गंध रात्र होती.व ११/०५/२०२३ रोजी महानैवद्य दाखवून उरूस साजरा करण्यात आला.समस्त हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक व श्रद्धास्थान आहे. नवसाला पावणारे असे ख्याती असलेले जंगली पीरबाबा म्हणून ओळख आहे. अनेक हिंदू मुस्लिम भाविक भक्तांनी दर्शनासाठी रांग लावली होती. आज महानैवद देऊन ऊरसाची सांगता झाली.ऊरुस कमेटी पि.मो.जमादार ,आप्पासो फ.जमादार,आप्पालाल पा.जमादार ,मुशाईद जमादार,फकरुंदिंन जमादार,बाळासो जमादार,काशिम मुल्ला,रफिक मुल्ला, कमिटी आहे.

# नळदुर्गच्या उपजिल्हा रुग्णालयात साजरा होतोय फ्लोरन्स नाईंटीनगेल डे

## विश्वातल्या पहिल्या नर्सचा होतोय वाढदिवस साजरा



नळदुर्ग/ दादासाहेब बनसोडेः नळदुर्ग या ऐतिहासिक शहरांमध्ये उपजिल्हा रुग्णालयाची निर्मिती झाली या रुग्णालयात संपूर्ण विश्वातल्या पहिली नर्स म्हणून ज्यांनी सन्मान मिळविला ते फ्लॉरेन्स नाईटीनगेल यांचा नळदुर्ग च्या उपजिल्हा रुग्णालयात साजरा होत आहे त्यांच्या वाढदिवसा मुळे नळदुर्ग येथील नर्स निर्मला पांडुरंग भालेराव ह्या मुरूम येथील रहिवासी आसुन बी ए पर्यंत शिक्षण मुरूम येथे झाले तर एम ए बालाघाट शिक्षण संस्था संचालित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथे झाले जी एन एम नर्सिंग कोर्स जिल्हा रुग्णालय अहमदनगर येथे झाले .

त्यानंतर पहिली नियुक्ती छत्रपती प्रमिला राजे रुग्णालय कोल्हापूर येथे झाली तिथे दोन वर्ष चांगल्या पद्धतीची रुग्ण सेवा केली त्यानंतर कोल्हापूर नंतर धाराशिवच्या जिल्हा रुग्णालयामध्ये नियुक्ती करण्यात आली यामध्ये बारा वर्ष परिचारिका म्हणून खूप चांगल्या पद्धतीने सेवा दिल्याने अनेक अधिकाऱ्यांन कडुन कौतुकाची थाप मिळाली अनेक वरिष्ठांचे मार्गदर्शन मिळाले प्रेरणा मिळाली बारा वर्षानंतर तुळजापूर येथे उपजिल्हा रुग्णालयामध्ये बदली झाली बरेच काळ सेवा केली अनेकांना खूप चांगल्या पद्धतीने सेवा दिल्याने त्या रुग्णालयात पण काही वरिष्ठांकडनं स्थानिक राजकीय सामाजिक कार्यकर्त्याकडून कौतुक होऊ लागले सलग सहा वर्षे सेवा केले या सेवेमध्ये तुळजापुरात अनेक अनुभव पहावयास मिळाले आज रोजी नळदुर्ग येथे उपजिल्हा रुग्णालय येथे दोन वर्ष कार्यरत आहे माझे लग्न नाशिक येथील रहिवासी आसलेल्या राजेंद्र पवार यांच्याशी झाले .

नळदुर्ग उपजिल्हा रुग्णालयामध्ये परिचारिका म्हणून रुग्ण सेवा करत असताना खूप चांगल्या पद्धतीने या ठिकाणी नळदुर्ग करणे आणि प्रशासनाकडून खूप चांगल्या सोयी सुविधा मिळाल्या यामध्ये नळदुर्ग शहरातील उपजिल्हा रुग्णालयामध्ये ओपीडी सुरू झाली नळदुर्ग येथील नागरिक प्रतिष्ठित पत्रकार असतील प्रशासनातील अनेक अधिकारी असतील अशा सर्वच स्तरातून चांगले सहकार्य मिळाले त्यामुळे नळदुर्ग या ऐतिहासिक शहरात नाविन्यपूर्ण निर्मिती झालेल्या उपजिल्हा रुग्णालय यामध्ये काम करण्यासाठी आम्ही तत्पर आहोत आणि काम करण्यास आवडेल पण अशी परिस्थिती नळदुर्ग शहरात आहे खूप चांगल्या पद्धतीची सेवा आम्ही रुग्णाला देणार असून त्या रुग्णांच्या विविध प्रकारच्या रोगराई संपुष्टात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहोत ही रुग्णसेवा कायमस्वरूपी चांगली चालावी म्हणून जगातली पहिली झालेली नर्स फ्लोरन्स नाईंटीनगेल यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आज १२ मे २०२३ रोजी उपजिल्हा रुग्णालयामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेला आहे हे आयोजन जिल्हा रुग्णालय नळदुर्ग येथील परिचारिका डॉक्टर्स या सर्वांनी मिळून केलेल आहे .उद्या घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमास नागरिकाने सहकार्य करावे असे मत परिचारिका प्रमुख निर्मला भालेराव यांनी केले आहे .

# आवताडे शुगर अँड डिस्टीलरीजचे चेअरमन संजय आवताडे यांच्या वाढदिवसानिमीत्त पंढरपूर येथे विविध कार्यक्रम




पंढरपूर/प्रतिनिधीः आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज चे चेअरमन श्री संजय (मालक) आवताडे यांच्या वाढदिवसा निमीत्त पंढरपूर येथे विविध कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला. विधायक कार्याचा अवलंब करून व अनावश्यक खर्चाला आळा घालून एक समाजाची बांधिलकी म्हणून विविध ठिकाणी वेगवेगळे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी प्रमुख उपस्थित आमदार पुत्र तथा युवक नेते मा.विराज दादा आवताडे हे उपस्थित राहिले. श्री गोपालनाथ गोशाळा गोपाळपूर येथे चारा वाटप, वृक्षारोप, रामकृष्ण हरी वृद्ध आश्रम येथे मिष्ठान्न भोजन आयोजित करण्यात आले होते.सदर कार्यक्रमाचे संजय मालक आवताडे, स्नेह परिवाराचे श्री. राहुल गावडे, गणेश दादा शिंदेनाईक, पांडुरंग वाडेकर यांनी संयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख उपस्थिती संदिप आबा पाटील प्रविण पिसाळ,रवि महागावकार,रवी सुर्वे,संजय लवटे सर,नाना निकम, आदी मान्यवर उपस्थित होते

# नळदुर्ग शहररात रूग्णांना फळे वाटप करुन ॲड.प्रकाशजी आंबेडकरांचा वाढदिवस साजरा



तुळजापूर/प्रतिनिधीः वंचित बहुजन आघाडी चे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब तथा प्रकशजी आंबेडकर यांच्या वाढ दिवसा निमित्त सिव्हिल हॉस्पिटल नळदुर्ग येथे रुग्णांना फळे वाटप करण्यात आले यावेळी डॉ. सुरेंद्र मडके,डॉ. राहूल जेडगे, सिस्टर निर्मला तोडकरी, निर्मला भालेराव, सुमन फुले, मनिषा होगले, शर्मिला पवार, स्वाती बनसोडे, आम्रपाली कुंभार, निता शिंदे, प्रज्ञा गवळी, सुरेश शेलार, सूरज राठोड, योगेश पवार, उमेश दिघे, शीतल चिलोबा, गंगाधर केरले इत्यादी हॉस्पिटल चा स्टाफ उपस्थित होता. यावेळी वंचित बहुजन आघाडी चे माजी जिल्हा अध्यक्ष मारुती बनसोडे यांनी प्रास्ताविक केले व जिल्हा सह सचिव आर आर गायकवाड यांनी डॉक्टरांचे स्वागत केले तर विजय बनसोडे संपादकतथा सामाजिक कार्यकर्ते उस्मानाबाद, वंचित बहुजन आघाडी चे तुळजापूर तालुका युवा आघाडीचे अध्यक्ष अंकोल वाघमारे, युवा आघाडीचे चे जिल्हा प्रवक्ते गोविंद भंडारे, युवा आघाडीचे चे जिल्हा उपाध्यक्ष आशिष लोंढे, आर. एस.गायकवाड, मारुती बनसोडे, सतिश बनसोडे यांच्या हस्ते रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आले

# पित्याने दान केले सून, मुलगी,नात यांच्या वजनाइतके दीड टन पुस्तके




अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तथा साहित्यिक स्वामीनाथ हरवाळकर यांनी आपल्या आयुष्यात वाचनाचा छंद लागल्यापासून संकलित केलेले सुमारे दीड टन वजनाची पुस्तके श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालयाला आपल्या मुलाच्या लग्नात भेट म्हणून दान दिले. मुलगी श्रीपूर्णा हिने सांगितले बाबा पोतेभर पुस्तके तुमच्या खोलीत पडलेले आहेत ते सध्या कोण वाचत नाही आम्ही रद्दीला घालतो.त्यावेळी वडील स्वामीनाथ हरवाळकर म्हणाले. हे अजरामर साहित्य मी गोळा केलेला आहे.ते पुढच्या पिढीला वाचता यावा म्हणून मुलगी,सून,नात या सर्वांच्या वजनाइतके पुस्तके मी वाचनालयाला दान देत आहे.

वयाच्या पंधराव्या वर्षापासून स्वामीनाथ हरवाळकर यांनी ययाती, मृत्युंजय,पानिपत,छावा, छत्रपती शिवाजी महाराज यासह असंख्य दर्जेदार पुस्तके गोळा केली होती. त्याच्यासाठी एक स्वतंत्र खोली काढून वाचनालय स्थापन केले.पण सध्या युवा पिढीमध्ये वाचनाची सवय कमी होत असल्याने पुस्तके कालबाह्य होत आहेत. म्हणून मी दान देण्याचा निर्णय घेतल्याचे स्वामीनाथ हरवाळकर यांनी सांगितले. श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालयाचे मुख्य ग्रंथपाल दत्तात्रय बाबर व दिनकर शिंपी यांच्याकडे मुलगी श्रीपूर्णा,सून युगंधरा, नात अविरा यांच्या वजनापेक्षा अधिक पुस्तके हरवाळकर यांनी सुपूर्त केले.या कामी उद्योगपती सुधीर माळशेट्टी, नागेश कोनापुरे,शरणू आळोळी, शैलशिल्पा जाधव,अरुण जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# आर्थिक संकटात असलेली पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक नफ्यात आणली : चेअरमन नागेश भोसले






पंढरपूर/प्रतिनिधीः गेल्या कित्येक वर्षापासून आर्थिक संकटात असलेली पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक चेअरमन पद स्वीकारल्यापासून पंढरपूर मर्चंट बँक ही आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आम्ही अथक प्रयत्न केले. कर्ज वसुली ही सक्तीने केल्यामुळेच कर्ज वसुली शक्य झाली. कारण आपल्या बँकेच्या असंख्य ठेवीदारांनी विश्वासाने आपल्या ठेवी या मर्चंट बँकेत ठेवलेले आहेत.. या ठेवी च्या आधारेच कर्ज वाटप केले जाते. कर्ज कर्ज वसुली करणे हे क्रमप्राप्त आहे. कर्ज वसूल झाले तरच बँक सुरळीतपणे चालत असते. तसेच सभासदांमध्ये ग्राहकांमध्ये त्यामुळे विश्वासहारता ही वाढीस लागलेली आहे. पंढरपूर मर्चंट बँक या बँकेचे कर्ज थकीती चे प्रमाण मोठ्या प्रमाणात होते. बँकेचे चेअरमन पद स्वीकारल्यापासून पंढरपूर मर्चंट बँक ही कशी नफ्यात येईल, तसेच कर्मचारी वर्ग वाढवण्याचे धोरण, कर्मचाऱ्यांचे वेतन वाढवण्याचे धोरण, बँकेच्या अन्य शाखेचे बांधकाम आधी विकास कामे व कल्याणकारी कामे ही करण्यात आली. सभासदांना लाभांश वाटप रिझर्व बँकेच्या आदेशानुसार दरवर्षी वाटप केले जाते. त्यामुळे सभासद वर्गामध्ये समाधान व्यक्त केले जाते. तोट्यात जात असलेली ही पंढरपूर मर्चंट बँक ही नफ्याच्या दिशेने वाटचाल करू लागलेली आहे. काही विरोधकांना कर्ज वसुलीचा त्रास झाल्यामुळे वेगळी चूल त्यांनी आता मांडलेली आहे. बँकेची सभासद मतदार हेसुद्धा जाणकार आहेत. बँकेचे हित कोणते लोक पाहतात याची त्यांना जाणीव आहे.

नागेश भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त करीत असताना पुढे म्हणाले या विरोधकांना आम्ही केलेली सक्तीची कर्ज वसुली हे त्यांना रुचलेली नाही. म्हणूनच वेगळे पॅनल उभा करून ही बँक व्यापाऱ्यांची आहे. राजकारण्यांची नाही असे म्हणू लागले परंतु आमच्या दि पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक सहकार विकास आघाडी या आघाडीमध्ये जवळपास सर्वच जण हे व्यापारी आहेत. व्यावसायिक आहेत. व्यापाऱ्यांची बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेला थकीत कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढण्याचे काम केलेले आहे. विरोधकांच्याकडे कुठलीही विकास व प्रगतीचे कुठलेच धोरणे नाही. आमची बँक, आमची बँक असे म्हणणारे काही महाभाग आपल्याच बँकेला थकीत कर्जाच्या गर्तेत टाकण्याचे काम आणि बँकेला विकासापासून दूर ठेवण्याचा मानस या विरोधकांचा आहे की काय ?असे वाटू लागले आहे. बँकेचे सभासद मतदार हे सुज्ञ व जाणकार आहे बँकेला प्रगतीपथावर नेणाऱ्या पॅनेललाच सभासद विजयी करणार आहे. असे नागेश काका भोसले यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केले.

# शब्दकोडे क्र १३०



आडवे शब्द १. नसता संबंध जोडणे (वाक्य प्रचार) ७. हिंमत, धैर्य १०. मालाची विक्री ११. नवविवाहितेच्या गळ्यातील एक दागिना १२. उपस्थित १४. अभिनय म्हणजे जणू ---- प्रवेश! १७. वर्ष, साल १८. तुझे (कवितेत) १९. रक्षाबंधन २०. मरेपर्यंत २२. लिंबू-पाणी २३. आकाराची उभी रेघ २४. धाक २६. कवडीमोल २८. क्रिकेटमधील धाव ३०. समोरासमोरची चकमक ३२. श्वसनेंद्रिय ३३. रुग्णालय ३५. वर-वधूची मिरवणूक ३७. पैसा आणि बळ यांचा खेळ! ३८. बोजा, वजन ३९. टप्पा, अंतर ४०. विजांचा आवाज ४१. श्रीकृष्णाचे वडील व आई ४३. देव ४४. स्वीकारलेले अवघड काम ४७. देशी 'फ्रीज'! ४८. कागदाचे मोजमाप ५१. तपासनीस (इंग्रजी) ५२. नवीन, न वापरलेली ५५. रामदासस्वामींचा जन्मदिन ५७. एखादे काम करण्यास समर्थ असलेला, क्षमता असलेला ५९. पांढऱ्या टोपीचे गवत ६१. जागृती ६२. शिक्का ६४. श्रीमंत ६७. कैद ६९. लहानच्या विरुद्ध ७०. नासधूस, नासाडी ७३. नरम स्वभावाचा ७४. घराचे धाबे, माळा ७६. चानी ७७. सान ७८. भूकंप ७९. अंत:करण

उभे शब्द १. वस्ती २. हत्तीची ललकारी ३. चकचकीत ४. पाणी साठविण्याचे पात्र (इंग्रजी) ५. आवडता, प्रिय ६. रंग ७. द्रव्य, संपत्ती ८. माझे ९. भरपूर चोप देणे (वाक्य प्रचार) ११. कन्या, मुलगी १३. एक गळीत धान्य १४. दुर्दशा १५. नाद, स्वर, आवाज १६. वेदना १७. याशिवाय उद्धार नाही! १९. वहिवाट, जाणे-येणे २१. दालचिनी २३. पाण्याचा पाट २५. व्रत, नेम २६. मर्कट २७. 'आनंददायी' मिष्टान्न २९. नवरामुलगा ३१. भ्रमर, भुंगा ३२. न आवडणाऱ्या व्यक्तीचे गुणही दोष वाटतात याअर्थी वाक्यप्रचार ३४. जनगणना ३६. लाल व निळा यांच्या मिश्रणातून तयार होणारा रंग ३७. सकसच्या विरुद्ध ३८. किंमत ४२. फळ-पान यांना झाडाशी जोडणारा भाग ४३. सुख देणारी ४५. धनादेश (इंग्रजी) ४६. उत्तराधिकारी ४९. सहाय्यक ५०. आपले राष्ट्रगीत ५२. नाजूक ५३. प्रत्येक दिवशी ५४. फाल्गुनातील पंचमीचे विशेषण ५६. शिक्षा ५८. माफी ५९. थंडी ६०. मजेने रेंगाळत, --- गमत ६३. आंब्याची पोळी ६५. श्रीकृष्णाचे एक नाव ६६. प्रवेश करणे ६८. हद्द (करणे) ७१. जिवलग ७२. मऊ ७५. खून, हत्या


श्रध्दास्थान
अक्कलकोट व दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती
नुतन संचालकांचे हार्दिक अभिनंदन!
दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या
नुतन सभापतीपदी सातलिंगप्पा उर्फ अप्पू परमशेट्टी
व उपसभापतीपदी सिध्दाराम बाके
निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !
सभापती
सातलिंगप्पा परमशेट्टी
उपसभापती
सिध्दाराम बाके
संचालक
मोतीराम राठोड
संचालक
देवेंद्र बिराजदार
संचालक
विश्वनाथ कोगनूर
संचालक
मल्लिकार्जुन झळकी
संचालक
विश्वनाथ नागूर
संचालक
सिध्दाराम तोळणुरे
संचालक
निंगण्णा पुजारी
संचालक
वहिदपाशा शेख
संचालिका
सौ.सुवर्णा मचाले
संचालिका
सौ.अश्विनी सालेगांव
शुभेच्छुक
पदाधिकारी व कार्यकर्ते भारतीय जनता पार्टी, दुधनी शहर